आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ,
पुणे-४११००१
दुरध्वनी- ०२० -२६३६०९४१
E-mail:trti.mah@nic.in
Website: trti.maharashtra.gov.in

जा क्र. आसंप्रसं/२०२३-२४/स्पर्धा परीक्षा/का- ४/ 8550 दिनांक : ०१.११.२०२३ 02

## महत्वाची सूचना

**महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी संघ लोकसेवा आयोग यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा स्पर्धा पूर्व परीक्षांच्या संपूर्ण तयारीकरिता दिल्ली येथील खाजगी नामांकीत संस्थेमधून प्रशिक्षण देणे योजनेचा लाभ घेणाऱ्या इच्छूक उमेदवारांच्या मूळ कागदपत्रे तपासणी करण्याबाबत...**

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी संघ लोकसेवा आयोग यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा स्पर्धा पूर्व परीक्षांच्या संपूर्ण तयारीकरिता दिल्ली येथील खाजगी नामांकीत संस्थेमधून प्रशिक्षण देणे योजनेच्या लाभाकरिता दिनांक २१.१०.२०२३ रोजी सामाईक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) घेण्यात आली.

सदर सामाईक प्रवेश परीक्षा (CET) चा निकाल दिनांक ०१.११.२०२३ रोजी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या https://trti.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर जाहीर करण्यात आला आहे. सदर परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची निवड यादी व प्रतीक्षा यादी दिनांक ०१.११.२०२३ रोजी जाहीर करण्यात आली आहे.

**या यादीतील उमेदवारांना सदर सूचनेद्वारे कळविण्यात येते की,**

- दिनांक ०१ ते ११ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत आपले सर्व मूळ कागदपत्रे व त्या सर्वांची एक छायांकित प्रत self attested करून आपले जमात वैधता प्रमाणपत्र निर्गमित केलेल्या संबंधित अनुसूचित जमात प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयाकडे विहित कालावधीत उपस्थित राहून आपली कागदपत्रे तपासून घेणे आवश्यक आहे.
- निवड यादीतील व प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांनी आपल्या मूळ कागदपत्रांसह तसेच त्याच्या छायांकित प्रतीसह सदर सुचनेसोबत देण्यात आलेले रु. १००/- च्या स्टंप पेपरवर हमीपत्र प्रिंट करून त्यावरी माहिती कागदपत्रे तपासणी अधिकारी यांच्यासमोर भरून सोबत सद्यस्थितीतील एक फोटो चिटकवून ते हमीपत्र आणि इतर संबधित कागदपत्रांच्या छायांकित प्रतीचा संच समिती कार्यालयातील तपासणी अधिकाऱ्यांकडे जमा करावयाचे आहे.
- सदर कागदपत्रे तपासणीदरम्यान काही दोष आढळल्यास आपणांस मिळालेला लाभ प्रतीक्षा यादीतील उमेदवारांस देण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी व त्यानुसार कागदपत्रे तपासणी पूर्ण करावी.

**तपासणीसाठी आवश्यक कागदपत्रे :**

**१. संबधित परीक्षेसाठी online स्वरुपात भरलेला मूळ अर्जाची प्रत, त्यावर रंगीत सध्याचा फोटो तसेच सोबत एक फोटो जोडावा.**
**२. अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र छायांकित प्रत**
**३. अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र छायांकित प्रत**
**४. दहावी गुणपत्र किंवा प्रमाणपत्र छायांकित प्रत**

५. बारावी गुणपत्र किंवा प्रमाणपत्र छायांकित प्रत

६. पदवी गुण पत्र किंवा प्रमाणपत्र छायांकित प्रत

७. पदव्युत्तर गुण पत्र किंवा प्रमाणपत्र छायांकित प्रत

८. डोमीसाईल प्रमाणपत्र छायांकित प्रत

९. पॅनकार्ड छायांकित प्रत

१०. आधारकार्ड छायांकित प्रत

११. आधारकार्ड लिंक असलेले बँक तपशील — पास बुक छायांकित प्रत

१२. तहसीलदार कार्यालयातून निर्गमित केलेला मूळ उत्पन्नाचा दाखला प्रत (मूळ प्रत जमा करावी.)

१३. सिविल सर्जन यांनी निर्गमित केलेला अपंगाचा दाखला छायांकित प्रत

१४. उपायुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय यांनी निर्गमित केलेला अनाथांचा दाखला छायांकित प्रत (लागू असल्यास)

१५. उमेदवाराचे हमीपत्र ( रु. १००/- च्या स्टॅंप पेपरवर)

(चंचल पाटील)
सहसंचालक